**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**लेखा विभाग**

क्रमांक/लेखा/५/कावि/८४७७/२०१७

दिनांक २८/०९/२०१७

**विषय :- निविदा प्रक्रियेबाबत.**

**परिपत्रक**

चालु आर्थिक वर्षात महापालिकेचे अंदाजपत्रक विलंबाने मंजुर झाल्याने निविदा प्रक्रीया देखील काहीशा विलंबाने होत आहेत. निविदा प्रक्रीया गतीने होण्याकरिता व परिपत्रक दि.04.08.2017 व शासन निर्णय दि.01.12.2016 मधील वेळापत्रकांचे पालन होण्याकरिता पूढिल 15 नोव्हेंबर 2017 पर्यंत निविदा समीतीने दररोज सकाळी 10.30 ते 11.30 या कालावधीत समीतीचे कामकाज लेखा विभागात थांबुन करावे. व त्यानंतरच समीती सदस्यांनी इतर कार्यालयीन कामकाज करावे. एखादया सदस्यास आजारपणामुळे वा दौऱ्यावर जावे लागल्यास वा रजेवर असल्याने त्यादिवशी समीतीचे कामकाज होऊ न शकल्यास दुसऱ्या दिवशी दोन तास काम करुन समीतीने मागे पडलेले आधल्या दिवशीचे काम पुर्ण करावे.

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति,

सर्व संबंधित विभागप्रमूख

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**लेखा विभाग**

क्रमांक/लेखा/५/कावि/८४७६/२०१७

दिनांक २८/०९/२०१७

**विषय :- निविदा प्रक्रियेबाबत.**

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र शासन उद्योग , उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमाक: भांखस-२०१४/प्र.क्र. ८२/भाग-III/उद्योग-४ दिनांक १ डिसेंबर २०१६

२. क्रमांक/लेखा/१अ/कावि/८७५८/२०१७ दि.४/०८/२०१७

**परिपत्रक**

बांधकामे व इतर तत्स्म कामांकरिता शासनाने सार्वजनिक बांधकाम विभाग शा.नि. क्रमांक/सीएटी २०१७/प्र.क्र. ८/इमा-२, दि.12/04/2017 व शासन शुध्दीपत्रक क्रमांक/सीएटी २०१७/प्र.क्र. ८/इमा-२, दि.29/06/2017 नुसार मार्गदर्शक तत्वे जारी केले आहेत. त्यावरुन महापालिकेने परिपत्रक क्रमांक/लेखा/१अ/कावि/८७५८/२०१७ दि.४/०८/२०१७ जारी करण्यात आलेले आहे. तसेच वस्तु व सेवांच्या खरेदीकरीता शासनाने शा.नि. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-iii /उद्योग-4 दि.01.12.2016 निर्गमीत केलेला आहे.त्याप्रमाणे पुढे काढण्यात येणाऱ्या व सध्या प्रक्रीया सुरु असलेल्या निविदांबाबत काटेकोरपणे कार्यवाही करावयाची होती. यात कुचराई करणारा शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील याची नोंद घ्यावी.

शासननिर्णय दि.01.12.2016 मधील खरेदी समित्या महापालिकेत उपलब्ध् होणे शक्य नसल्याने त्याऐवजी परिपत्रक दि.4/08/2017 मधील समितीच या प्रयोजनासाठी खरेदी / निविदा समीती म्हणुन काम पाहतील.

परिपत्रक दि. 4/08/2017 मधील तरतुदींनुसारच्या क्षेत्रीय स्तरावरील निविदा समीतीत अंशत: बदल करण्यात येत असुन क्षेत्रीय स्तरावरील (रु.10.00 लक्षांपर्यंतच्या) सर्व प्रकारच्या निविदा प्रक्रीया यापुढे क्षेत्रीय स्तरावरच पुर्ण करण्यात याव्यात या निविदा समीतीत क्षेत्रीय अधिकारी ,लेखाधिकारी/ लेखापाल व संबंधीत कार्यकारी अभियंता वा संबंधीत विभागाचा क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी राहील. त्यांनी परिपत्रक दि. 4/08/2017 व शा.नि. दि.01.12.2016 मधील अटीशर्तींचे पालन करुन निविदा प्रक्रीया राबवावी.

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति,

सर्व संबंधित विभागप्रमूख